|| श्री गणेशाय नमः ||

Astro • Puja • Vastu


# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार


योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078

|| श्री दत्त ||



श्रीपादश्रीवल्लभस्वामींनी विशेष पुरस्कारिलेले

# ॥श्रीदत्तअनघालक्ष्मीव्रत॥

## ॥अनघाष्टमीव्रत॥

सर्व स्त्री- पुरुषांनां संतती, संपत्ती, विवाहसौख्य व शांतीसाठी अद्‌भुत, प्राचीन व शास्त्रशुद्धव्रत

महाराष्ट्रात प्रथमच प्रकाशित

गुरुतत्त्व प्रकाशन

॥ श्रीदत्त ॥

(महाराष्ट्रात सर्वप्रथम प्रकाशित)

श्री श्रीपादश्रीवल्लभस्वामींच्या घराण्यातील मूळ परंपरेनुसार एकमेव

# ॥ श्रीदत्तअनघालक्ष्मीव्रत ॥

॥ श्रीअनघाष्टमीव्रत ॥

( सर्व स्त्रीपुरुषांसाठी संतती, संपत्ती विवाहसौख्य व शांतीसाठी अद्भुत, प्राचीन व शास्त्रशुद्धव्रत )

विशेष सहकार्य– कै. पू. श्री. मल्लादि गोविंदाचार्य दीक्षितुलु, भीमवरम्

संपादक – सुहास मधुकर जोशी, कोल्हापूर.

Fo... Astrologers
Proprie...

गुरुतत्त्व प्रकाशन

मधुमती, २९१४ ए, वॉर्ड, वांगीबोळ, कोल्हापूर – १२, फो. (०२३१) २६२४७९२,

मोबा. ०९८५० ९६६२९७/ ०९७६३२ ४४४९७

• प्रकाशिका
सौ. शिल्पा सुहास जोशी
वांगीबोळ, कोल्हापूर १२
• प्रथमावृत्ती– १०।२००८
• दशमावृत्ती– ०२।१७
• Pub. No. 07/08
• ISBN NO.
978-81-908902-7-4
• अक्षर जुळणी
गुरुतत्त्व अक्षरालय,
वांगीबोळ, कोल्हापूर
• मुखपृष्ठ
मयूर कुलकर्णी

सेवा मूल्य-
रू. २०/- फक्त

**सूचना-**

श्रीपाद श्रीवल्लभस्वामींच्या मूळ घराण्यातील परंपराप्राप्त असलेल्या या अनघादत्तव्रत ग्रंथाच्या प्रसिद्धीचे सर्वाधिकार, श्रीपादांच्या मातुल घराण्यातील वंशज, श्री मल्लादि दीक्षितुलु यांनी, पूर्णकृपाशीर्वादासह गुरुतत्त्व प्रकाशन, कोल्हापूर या एकमात्र संस्थेस दिले आहेत. तरीही या व्रताची प्रसिद्धी पाहून हे व्रत अथवा यातील सारांश काही ठिकाणी परस्पर छापण्यात येत असल्याचे दिसून आले आहे, हा ग्रंथ पूर्णतः किंवा आंशिकरूपात कोणालाही कोणत्याही प्रकारे कोणत्याही भाषेत मुद्रित वा प्रकाशित करता येणार नाही.

**(सर्व हक्क प्रकाशकाकडे सुरक्षित)**

## श्री मल्लादि गोविंदाचार्य दीक्षितुलु, पीठापुरम्

**I, MALLDI GOVIND DEEKSHITULU,**
SIVALAYAM STREET, VEERAVASARAM,
534245, WEST GODAVARI DISTRICT, ANDHRA PRADESH PH- 08816- 285562 / MO- 09948683773

DO HERE BY GIVE EXCLUSIVE PERMISSION TO SUHAS MADHUKAR JOSHI TO PRINT AND PUBLISH SHRI ANAGHA DATTA SHRIPADA SHRIVALLABHA KATHA INTO MARATHI BY TRANSLATING IT INTO MARATHI FROM MY ORIGIONAL WORK IN TELUGU

NO OTHER PERSON OR PERSONS ARE GIVEN THIS EXCLUSIVE PERMISSION EXCEPT SHRI SUHAS MADHUKAR JOSHI OF KOLHAPUR

GIVEN HEREUNDER MY SIGNATURE ON THE DATE OF MY APPROVAL

**MALLADI GOVINDA DEEKSHITULU**
DATE 09-3-2008

## श्रीस्वामी जगद्‌गुरु शंकराचार्य पीठ, करवीर

बुधवार, ६।२।०८ पब्लिक ट्रस्ट नं. ए-१३९१

**श्री. वे.शा. सं. सुहास जोशीगुरुजी, पीठस्थ देवतांचे अनेक शुभाशीर्वाद व आमचे नारायणस्मरण**

अनघाष्टमीव्रत श्रीदत्तसंप्रदायातील एक अप्रकाशित व्रत आहे, फारच कमीजणांना त्याची संपूर्ण माहिती आहे, आपण अथक प्रयत्नाने व दत्तगुरूंच्या कृपाशीर्वादाने ते व्रत मिळविलेत, संशोधित केलेत व आता ग्रंथरूपाने प्रकाशित करीत आहात, या आपल्या कार्यासाठी धन्यवाद. तमाम जनतेला हे व्रत आपण सोपवीत आहात, त्यामुळे दत्तसंप्रदायाची वाढ होऊ शकेल, प्रत्येकाने आपापल्या अधिकारानुरूप हे व्रत करावे व श्रीदत्तगुरूंच्या कृपाप्रसादास प्राप्त व्हावे, हीच पीठस्थदेवतांच्या चरणी प्रार्थना.

पुनश्च एकदा पीठस्थदेवतांचे उत्तम आशीर्वाद व आमचे नारायणस्मरण, सर्वांस विदित व्हावे. महानुशासनं वरिवर्ति

**विद्याशंकरभारतीस्वामी**
**श्रीमद् जगद्‌गुरु शंकराचार्य मठ, करवीर पीठ, कोल्हापूर.**

## संपादकीय

श्रीपादवल्लभचरितामृत हा ७०० वर्षापूर्वीचा अद्‌भुत व प्रासादीक दिव्यग्रंथ नुकताच प्रगट झाला. या ग्रंथात श्रीअनघादत्तव्रताचा स्वतः श्रीपादवल्लभस्वामींनी पुरस्कार केला असून, संतती, संपत्ती, पत्नीलाभ व गृहकलहादि अलक्ष्मीनिरसनासाठी सर्वांनी हे व्रत करावे, अशी आज्ञा दिली आहे.

श्रीपादवल्लभस्वामींच्या मातुल घराण्यातील वंशज पू. दीक्षितुलु गुरुजींच्या मार्गदर्शनानुसार त्यांच्या घराण्यातील पारंपारीक व गुरुवरदानांकित व्रताचा लाभ घेऊन सर्वांनी परमफल मिळवावे, ही जगद्‌गुरु श्रीदत्तात्रेयांच्या भवतारकचरणी प्रार्थना.

**संपादक- सुहास मधुकर जोशी**

## श्रीपादश्रीवल्लभचरित्रामृतातील श्रीअनघादत्तस्वरूप व व्रताविषयीची माहिती

**श्रीअनघादेवीचे स्वरूप** - श्रीपादप्रभू म्हणाले, अनघालक्ष्मीचा अनघ म्हणजे माझे दत्तस्वरुप होय, महासरस्वती, महालक्ष्मी आणि महाकाली या तिघींचे मिळून, आगळे वेगळे दिव्यमातृत्वस्वरूप म्हणजेच अनघालक्ष्मीचा आविर्भाव, या कारणानेच अनघालक्ष्मी ही महासरस्वती, महाकाली व महालक्ष्मी या तीनहीरूपांनी एकत्र धारण केलेल्या, तादात्मयस्थितीचे स्वरूप आहे, या तीनही देवतांचा आधार अशी ही अतीत दिव्यशक्ती आहे, माझे अनघस्वरूप म्हणजे ब्रह्मा, विष्णु आणि रुद्र या तीघांनी एकत्र येऊन, तादात्म्यस्थिती धारण करुन, या तीघांचा आधार असणारी त्रिशक्तिस्वरूपिणी अनघा, हिला माझ्या वामभागात धारण केलेले, असे माझे शक्तिस्वरूप आहे, असे ध्यानात ठेव. (श्रीपाद चरित्रा० अ. २८ पृ. २०४)

**दशमहाविद्यास्वरूपिणी अनघादेवी** - श्रीपादप्रभू म्हणतात, दशमहाविद्यास्वरूपिणी अनघादेवी व तिचा प्रभू अनघ यांची अर्चना केली असता, अष्टसिद्धींची प्राप्ती होते, दशमहाविद्यांची आराधना केल्याने मिळणारे फल, केवळ श्रीपादांची किंवा दत्तात्रेयांची आराधना केल्याने तत्काळ प्राप्त होते, दत्तात्रेयांची आराधना तत्काळ फलदायिनी आहे, दत्तात्रेय हे सर्व देवांचे स्वरूप असुन, ते चतुयुर्गातील महान् अवतार आहेत, त्यांचा महावतारास समाप्ती नसुन, ते अत्यंत सुलभ साध्य आहेत. प्रत्येक महिन्यातील कृष्ण अष्टमीस अनघाष्टमी मानून, अनघामातेची पूजा, अर्चा करावी. या तुमच्या आराधनेने सर्व मनोकामना पूर्ण होतील. हे व्रत दत्तभक्तांना अत्यंत आदरणीय आहे, या व्रताच्या आचरणाने सर्व सुखांचीप्राप्ती होते. (अ. ४३ पृ २११)

**श्रीअनघादेवी व श्रीअनघदत्तांच्या आराधनेची फळप्राप्ती** - श्रीअनघादेवीचे रूप हे श्रीलक्ष्मीदेवीचेच प्रतिरूप आहे, तिच्यामध्ये राजराजेश्वरि, महालक्ष्मी व महाकाली या देवतांची लक्षणे ओतप्रोत भरली आहेत. श्रीअनघादेवीचे एक विष्णुरूपही आहे. त्याच्यात परमेश्वराची दत्तात्रेयांची लक्षणे परिपूर्ण भरलेली आहेत, यामुळेच अनघादेवीच्या आराधनासमवेत विष्णुरूप अनघाची आराधना केल्यास सर्वकर्मफळप्राप्ती होते.

(अ.४४ पृ २५९, २६०, २६१, २६२) **(श्रीपादश्रीवल्लभचरित्रामृतातून साभार उधृत)**



## ।। श्रीदत्तअनघालक्ष्मीव्रताची माहिति ।।

**व्रत कोणी व केव्हा करावे** - मार्गशीर्ष व माघ कृष्ण अष्टमीस, तसेच प्रत्येक महिन्याच्या कृष्णाष्टमीस (एखादे वेळी अशक्य झाल्यास शुद्धाष्टमीस) 'अनघाष्टमी' मानुन, लहानथोर स्त्री- पुरुषांनी (सपत्नीकांनी शक्यतो पत्नीसह ) सकाळी हे व्रत करावे, शक्य नसल्यास सायंकाळी स्नान करुन करावे. व्रताच्या दिवशी उपवास करावा, दिवसभर केवल फलाहार अथवा उपवासाचे पदार्थ खावेत. सायंकाळी आरतीनंतर भोजन करावे.

**हे व्रत का करावे** -ही अष्टमी 'अघ म्हणजे पाप' नाहीसे करते, त्यामुळे हे व्रत करणाऱ्याचे पापनिरसन व दारिद्र्यनाश होऊन त्याला दैवीसंपत्ती, अष्टैश्वर्यलाभ व सर्व सुखप्राप्ती होते. सर्वपुण्यकर्मफळांची प्राप्ती होते. मनोकामनापूर्ती व निर्मलकीर्तीलाभ होतो. सर्व रोगनिरसन होऊन, सातजन्म आरोग्यलाभ होतो. कुमारिकांना सद्गुणी वरप्राप्ती व सर्वत्र निर्मल यशलाभ होतो, स्त्रियांना सौभाग्यलाभ होऊन त्यांची कुटुंबसंतती वाढते, तसेच गृहकलहनिवृत्ती होऊन सुखशांती लाभते, सर्वत्र कल्याण होऊन, श्रीअनघामाता व श्रीदत्तात्रेयांचा अनुग्रह होऊनं, अंती मोक्षलाभ होतो.

**व्रताची मांडणी** – घराची स्वच्छता करुन, सडासंमार्जनादि करावे, यानंतर स्नान करुन, नित्यकर्म झाल्यानंतर देवासमोर अथवा शुद्धस्थानी चौरंग अथवा पाटावर वस्त्र घालुन, त्याभोवती रांगोळी काढावी. त्यावर मध्यभागी एकमूठ तांदुळ घालुन पूर्वेपासुन आठदिशेस एक एक मूठ तांदुळ घालावे, यानंतर मध्यभागी शुद्धपाण्याने भरलेला कलश ठेऊन, त्याला पाच हळदी, कुंकवाची बोटे ओढावीत. त्यामध्ये गंध, अक्षता, फूल, सुपारी- नाणे व आंब्याचा डहाळा घालावा, त्यावर तांदळाने भरलेले ताम्हण ठेऊन त्यात अनघदत्तमूर्ती ठेवावी, या दत्तपीठाच्या डावीकडे (आपल्या उजव्या हातास) चौरंगावर एकमूठ तांदूळ घालून त्यावर गणपतीची सुपारी, समोर पाच विडे (२ पाने, १ नाणे, १ सुपारी म्हणजे एक विडा) केळ, फळ इ. मांडावे तसेच गूळसाखर व २ नारळ ठेवावे.

**व्रतसूत्र** - श्रीअनघदत्तात्रेयांच्या मूर्तींजवळ लालदोरा (व्रतसूत्र) ठेवावा. (व्रतसमाप्तीनंतर तो पुरुषांनी उजव्या मनगटात तर स्त्रियांनी डाव्या मनगटात बांधावा. आपल्या सगेसोयऱ्यांनाही व्रतसूत्र द्यावयाचे असल्यास तितके दोरे ठेवावेत, व्रत झाल्यानंतर स्वीकारणाऱ्यांनी हे व्रतसूत्र प्रसाद म्हणुन अन्यथा स्वतः स व्रतारंभ करण्यास अनुमती व परंपरा स्वरूपात व्रतसूत्र स्वीकारावे व स्वतःच्या घरी हे व्रत आरंभावे व इतरांनाही आपल्या व्रताचे सूत्र द्यावे. पुढील अनघाष्टमीपूजेवेळी पहिल्यापूजेचे सूत्र काढून निर्माल्यात विसर्जित करावे.)

**व्रतपूजा** - यानंतर शास्त्रविधानानुसार मध्यभागी ताम्हणातील मूर्तीवर श्रीअनघादत्ताचे आवाहन करावे, कलशाभोवती आठदिशेस ठेवलेल्या तांदळाच्या पुंजावर अणिमादि अष्टसिद्धीस्वरूप अष्टदत्तपुत्रांचे आवाहन करावे, यानंतर **श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः ।।** या मंत्राने श्रीअनघादत्त, अणिमादि दत्तपुत्र व व्रतसूत्र इ. देवतांचे यथाविधी पूजन करावे व श्रीदत्तदेवांस तुळसीपत्राने व श्रीअनघामातेस कुंकवाने शतनामार्चन करावे.

**नैवेद्य इ.** - नैवेद्यास फळे, बोरे, शिरा व महानैवेद्य करावा, शक्य नसल्यास शिरा अथवा गुळाच्या खड्याचा नैवेद्य दाखवावा. तसेच ११ गृहस्थांना भोजन अथवा एकगृहस्थास शिधासामुग्री द्यावी किंवा एक मूठ तांदुळ व गुळाचा खडा देवासमोर ठेऊन नंतर हे योग्य व्यक्तीस द्यावे. यानंतर आपली मनोकामना श्रीअनघादत्तांस सांगून, दुःखनिवारणासाठी प्रार्थना करावी. यानंतर कथा वाचावी. उपस्थितांना श्रीदत्तअनघालक्ष्मीव्रताचे पुस्तक देऊन, या व्रताच्या प्रसाराचे पुण्य मिळवावे. सायंकाळी नैवेद्य, आरती करावी व रात्री नृत्यगायन व नामसंकीर्तनात जागरण करावे. नवमीस सकाळी देवता विसर्जन करुन, श्रीदत्तमूर्ती देवघरात ठेऊन, निर्माल्य वगैरे पूजावशेष वाहात्या पाण्यात सोडावे. असे हे चमत्कारी, सद्यःफलदायी व जागृत 'श्रीदत्तअनघालक्ष्मीव्रत' ज्या कामनेने करावे, तसा लाभ व श्रीअनघादत्तांचा वरदहस्त लाभतो. या व्रतासाठी परंपरा व आज्ञा घ्यावी असे शास्त्र आहे, त्यासाठी आशीर्वादामध्ये श्रीशंकराचार्यस्वामींनी सर्वांस श्रीशंकराचार्यपीठाच्यावतीने श्रीदत्तअनघालक्ष्मीव्रत करण्याची आज्ञा व परवानगीच दिली आहे, याचा सर्वांनी जरुर लाभ घ्यावा.



## ।। सिद्धमंगलस्तोत्र ।। (श्रीबापन्नार्य अवधानीकृत)

अनघाष्टमीचे व्रत करुन, श्रीपादवल्लभांचे पितामह श्रीबापन्नार्यांकडून दत्तदर्शनाच्या अनुभूतीत प्रगट झालेले हे सिद्धमंगलस्तोत्र म्हटले असता, सहस्रसद्ब्राह्मण भोजनाचे फळ लाभते, स्वप्नात सिद्धपुरुषदर्शन होते, सर्वमनोकामना पूर्ण होतात, जे भक्त काया, वाचा, मने श्रीदत्ताराधना करुन हा स्तोत्रपाठ करतात, ते श्रीपादवल्लभांच्या कृपेस पात्र होतात.

।। अथ सिद्धमंगलस्तोत्रारंभः।।

**श्रीमदनंत श्रीविभूषित अप्पललक्ष्मी नरसिंह राजा । जय विजयी भव, दिग्विजयी भव, श्रीमदखंड श्रीविजयी भव ।।१।।**
**श्रीविद्याधरी राधा सुरेखा श्रीराखीधरश्रीपादा। जय विजयी भव, दिग्विजयी भव, श्रीमदखंड श्रीविजयी भव।।२।।**
**मातासुमती वात्सल्यामृत परिपोषित जय श्रीपादा । जय विजयी भव, दिग्विजयी भव, श्रीमदखंड श्रीविजयी भव।।३।।**
**सत्यऋषीश्वरदुहितानंदन बापनाचार्ययुतश्रीचरणा। जय विजयी भव, दिग्विजयी भव, श्रीमदखंड श्रीविजयी भव।।४।।**
**सावित्रकाठकचयनपुण्यफला भारद्वाजऋषीगोत्रसंभवा । जय विजयी भव,दिग्विजयी भव, श्रीमदखंड श्रीविजयी भव।५।**
**दौ चौपाती देव लक्ष्मीगण संख्याबोधितश्रीचरणा । जय विजयी भव, दिग्विजयी भव, श्रीमदखंड श्रीविजयी भव।।६।।**
**पुण्यरूपिणी राजमांबासुतगर्भपुण्यफलसंजाता । जय विजयी भव, दिग्विजयी भव, श्रीमदखंड श्रीविजयी भव ।।७।।**
**सुमतीनंदन नरहरिनंदन दत्तदेवप्रभूश्रीपादा । जय विजयी भव, दिग्विजयी भव, श्रीमदखंड श्रीविजयी भव ।।८।।**
**पीठिकापुर नित्यविहारा मधुमतीदत्ता मंगलरूपा । जय विजयी भव, दिग्विजयी भव, श्रीमदखंड श्रीविजयी भव ।।९।।**

**।। इति श्रीबापन्नार्यकृत सिद्धमंगलस्तोत्रं संपूर्णम् ।।**

(श्रीपादश्रीवल्लभचरित्रामृतातून साभार उधृत)




**पूजेची सामुग्री-**

हळदकुंकू, (कुंकुमार्चनासाठी १ वाटी शुद्ध कुंकू) अष्टगंध, रांगोळी, फुले-दूर्वा-तुळशी (१०८ निवडलेली पाने) बेल, उदबत्ती, निरांजन, कापूर, कापसाची वस्त्रे, पंचामृत (दूध, दही, तूप, मध, साखर) अत्तर, पाट किंवा चौरंग १, पळी-भांडे, तांब्या २ ताम्हण २, देवाच्या गळ्यात दागिना, घंटा, समई, आंब्याचे डहाळे, गूळ-साखर, काड्याची पेटी, ब्लाऊजपीस १ नग , केळी व फळ, नारळ १ सुपारी ५, खारिक २, बदाम २, सुके खोबरे, तांदूळ, सुटी ५ नाणी, विड्याची पाने ५, श्रीदत्तात्रेय व अनघादेवीची मूर्ती अथवा प्रतिमा, (शक्य असल्यास शिऱ्याचा प्रसाद, महानैवेद्य)



## ।। श्रीदत्तअनघालक्ष्मीव्रतपूजा ।।

व्रत करणाऱ्या साधकाने व्रताच्या दिवशी उपवास करावा, प्रातःकाळी उठून, स्नान करुन, प्रथम स्वतःस तिलक लावावा, यानंतर आपली नित्य उपासना करुन, आपल्या घरातील देवांसमोर पाटावर बसून, देवांस हळद, कुंकू घालून, नारळ ठेऊन, कुलदेवतेस आवाहन व मनोभावे वंदन करावे व घरातील मोठ्यामाणसांना नमस्कार करून, त्यांचे मंगल आशीर्वाद घ्यावेत.

यानंतर ।। **पुंडरीकाक्षाय नमः** ।। हा मंत्र म्हणत, तुळशीपत्राने ते पाणी स्वतःच्या शरीरावर व पूजासाहित्यावर प्रोक्षण करावे. यानंतर पळीने उजव्या हातावर पाणी घेऊन, खालील तीन मंत्राने ते पाणी प्राशन करावे.

***आचमन* - ॐ केशवाय नमः । ॐ नारायणाय नमः । ॐ माधवाय नमः** । यानंतर एक पळी पाणी उजव्या हातावरुन ताम्हणात सोडत **ॐ गोविंदाय नमः** । म्हणावे.

***देवादिकांना वंदन* - श्रीमन्महागणपतये नमः** ।। (श्रीगणपतीचे स्मरण) **इष्टदेवताभ्यो नमः** । (उपास्यदेवतेचे स्मरण) **कुलदेवताभ्यो नमः** । (कुलदेवतांचे स्मरण) **ग्रामदेवताभ्यो नमः** । (गावच्या मूळ मुख्यदेवतेचे स्मरण) **वास्तुपुरुषदेवताभ्यो नमः** । (वास्तुपुरुषाचे स्मरण) **आदित्यादिनवग्रहदेवताभ्यो नमः** । (सूर्यादिनवग्रहांचे स्मरण) **सर्वेभ्यो देवेभ्यो नमो नमः**। (सर्वदेवांचे स्मरण) **सर्वेभ्यो ब्राह्मणेभ्यो नमो नमः** । (सर्व ऋषी व संतांचे स्मरण) **सद्‌गुरुभ्यो नमः**। (आपल्या मोक्षगुरूंचे स्मरण) **एतत्कर्म प्रधानदेवताभ्यो नमः**। **अविघ्नमस्तु**। यानंतर हात जोडुन पुढील श्लोक म्हणावेत. यानंतर हातामध्ये अक्षता व पळीभर पाणी घेऊन, पुढीलप्रमाणे पूजेचासंकल्प करावा.

***संकल्पः*- मम तथा अस्माकं सकुटुंबानां सपरिवाराणां द्विपदचतुष्पदसहितानां क्षेमादि अभिवृद्ध्यर्थं चतुर्विधपुरुषार्थ**

**सिद्ध्यर्थं - सर्वापन्निवृत्ति- सर्वाभीष्ट फलप्राप्त्यर्थं हितवैरिणाकृत जारण-मारणादि सकलबाधा निरसपूर्वक ईत्यादिसकलभयनिरसनार्थं अलक्ष्मीनिस्सारणपूर्वक अखंडस्थिरलक्ष्मीप्राप्त्यर्थं अखंडदत्तभक्तिलाभार्थं श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्तप्रीत्यर्थं यथाशक्त्या दत्तअनघालक्ष्मीव्रतपूजां करिष्ये ।। निर्विघ्नार्थं महागणपतिपूजनं च करिष्ये ।।** असा मनोभावे संकल्प करुन उजव्या हातावरुन पाणी सोडावे. यानंतर श्रीमहागणपतिपूजन करावे.

*महागणपतिपूजनम् ।* **ऋद्धिबुद्धिसहित महागणपतये नमः । आवाहयामि ।**

**श्री महागणपतये नमः ।। आवाहनार्थे अक्षतान् समर्पयामि ।।** गणपतीच्या सुपारीला अक्षता वहाव्यात.

**श्री महागणपतये नमः । आसनार्थे अक्षतान् समर्पयामि ।** गणपतीला अक्षता वहाव्यात. यानंतर गणपतीला पाण्याने स्नान व पंचामृतस्नान घालावे, गणपतीस वस्त्राने स्वच्छ पुसून मूळजागी दूर्वांवर ठेवावे. **सुप्रतिष्ठितमस्तु ।** असे म्हणुन गणपतीला अक्षता वाहाव्यात. यानंतर गणपतीला कापसाचे वस्त्र वहावे. यानंतर गंध, अष्टगंध व गणपतीच्याच ठिकाणी ऋद्धिसिद्धीला हळदीकुंकू वहावे. यानंतर गणपतीला सुगंधी फुले व दूर्वा वहाव्यात.यानंतर उदबत्ती नीरांजन ओवाळावे व गुळखोबऱ्याचा नैवेद्य दाखवावा व गणपतीसमोरील विड्यावर व फळावर पाणी सोडावे.

**श्री महागणपतये नमः । महानीरांजन दीपं समर्पयामि ।।** नीरांजन ओवाळावे.

**श्री महागणपतये नमः । मंत्रपुष्पं समर्पयामि ।।** गणपतीला फूल वाहावे.

**वक्रतुण्ड महाकाय सूर्यकोटिसमप्रभ । निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा ।।** गणपतीची प्रार्थना करावी.

**अनया पूजया सकलविघ्नहर्ता महागणपतिः प्रीयताम् ।।** पाणी सोडावे. **।। मंगलमूर्ती मोरया ।।**



*कलशादिपूजा* - यानंतर पूजेसाठी आपण वापरत असलेल्या पाण्याच्या तांब्यालावर हात ठेवून खालील मंत्र म्हणावेत.

**वरुणाय नमः। गंधपुष्पं समर्पयामि ।।** असे म्हणून तांब्याला गंधाक्षत, फुल वाहावे.

**शंखाय नमः ।। गंधपुष्पं समर्पयामि ।।** असे म्हणून शंखाला गंध, फुल वाहावे.

**घंटायै नमः । गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।।** असे म्हणून घंटेला गंधाक्षत, फुल वाहून, घंटा वाजवावी.

**दीपाय नमः । गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।।** असे म्हणून समईला गंधाक्षत, फुल वहावे.

*मुख्यपूजारंभ* - **संकल्पोक्त अनघदत्तव्रतांगभूतं आदौ कल्पोक्त देवतावाहनं प्राणप्रतिष्ठापनं च करिष्ये ।।** असे म्हणून पाणी सोडावे. यानंतर पूर्वी सांगितल्याप्रमाणे कलशस्थापना व पूजन करून, त्याभोवती आठ दिशांना आठसुपाऱ्या अथवा आठ तांदळाच्या मुठी घालाव्यात व त्यावर अष्टदत्तपुत्रांचे आवाहन करावे, त्या देवता व त्यांची स्थापनास्थाने अशी,

**(अणिमा लघिमा प्राप्तिः प्राकाम्यं महिमा तथा । ईशित्वं वशित्वं च यच्च कामावसायिता ।।)**

१) ईशान्यदिशेस – **अणिमायै नमः । आवाहयामि । स्थापयामि । पूजयामि ।।** गंधाक्षतफूल घालावे.

२) आग्येयदिशेस – **लघिमायै नमः । आवाहयामि । स्थापयामि । पूजयामि ।।** गंधाक्षतफूल घालावे.

३) नैर्ऋत्येस – **प्राप्त्यै नमः । आवाहयामि । स्थापयामि । पूजयामि ।।** गंधाक्षतफूल घालावे.

४) वायव्येस – **प्राकाम्याय नमः । आवाहयामि । स्थापयामि । पूजयामि ।।** गंधाक्षतफूल घालावे.

५) मुख्यदेवाच्या डाव्या हातास – **ईशित्वाय नमः । आवाहयामि । स्थापयामि । पूजयामि ।।** गंधाक्षतफूल घालावे.

६) मुख्यदेवाच्या उजव्या हातास – **वशित्वाय नमः । आवाहयामि । स्थापयामि । पूजयामि ।।** गंधाक्षतफूल घालावे.

७) मुख्यदेवाच्या पश्चिमभागी – **कामावसायितायै नमः । आवाहयामि । स्थापयामि । पूजयामि ।।** गंधाक्षतफूल घालावे.

८) मुख्यदेवाच्या प्रथमपादाजवळ – **महिमायै नमः । आवाहयामि । स्थापयामि । पूजयामि ।।** गंधाक्षतफूल घालावे.

*(मध्यभागी कलशावर) **श्रीअनघदत्त आवाहन ।।**

**समासीनः प्रशान्तात्मा कृपाब्धिरनघाह्वयः । दत्तात्रेयो गुरुर्विष्णु ब्रह्मेशात्मा स नोऽवतु ।।**

**मुख्यदेवता श्रीमदनघदत्ताय नमः ।** आवाहयामि । स्थापयामि ।।

*(कलशावर अनघदत्तांच्या डावीकडे) **श्रीअनघालक्ष्मी आवाहन ।।**

**पद्मासना पद्मकरा भक्ताधीना पतिव्रता । अनघाम्बा महालक्ष्मीर्महाभागा च नोऽवतु ।।**

**मुख्यदेवता श्रीअनघालक्ष्म्यै नमः ।** आवाहयामि । स्थापयामि ।।

(देवतापीठास स्पर्श करुन, **प्राणाः प्रतिष्ठिताः संतु ।।** असे म्हणुन अक्षदा घालाव्यात.)

***षोडशोपचारपूजारंभः ।***

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः** ध्यायामि । असे म्हणून देवाला अक्षता वहाव्या.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः** आवाहयामि । असे म्हणून देवाला अक्षता वहाव्या.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः** आसनार्थे **तुलसीपत्रं समर्पयामि ।**

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः** पाद्यं **समर्पयामि ।** देवावर पळीभर पाणी घालावे.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः** अर्घ्यं **समर्पयामि ।।** देवाला गंधाक्षतफुलाचे पाणी घालावे.



**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः आचमनीयं समर्पयामि ।।** कापूरमिश्रित पाणी ताम्हनात सोडावे.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः स्नानं समर्पयामि ।।** देवावर पाणी घालावे.

***पंचामृतस्नान*** (दूध, दही, तूप, मध व साखर अशाक्रमाने देवास पंचामृतस्नान घालावे.)

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः पंचामृतस्नानं समर्पयामि ।।** यामंत्राने देवाला पंचामृतस्नान घालावे.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः शुद्धोदकस्नानं समर्पयामि ।** पंचामृतानंतर शुद्धपाण्याने स्नान घालावे.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः सकलोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।** यामंत्राने देवाला गंधाक्षतफूल घालावे. उदबत्ती, निरांजन ओवाळुन, पंचामृताचा नैवेद्य दाखवून प्रार्थना करावी.

**अनेन पंचामृतपूजनेन श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्तः प्रीयताम् ।** असे म्हणुन, पाणी सोडावे. यानंतर उत्तरेस देवनिर्माल्य विसर्जित करुन, देवांस अत्तर लावुन,गरमपाणी घालावे. व देव वस्त्राने स्वच्छ पुसून मूळजागी पुनः ठेवावा, यानंतर **सुप्रतिष्ठितमस्तु ।** असे म्हणुन देवास अक्षता घालाव्यात.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः कार्पासवस्त्रं समर्पयामि ।।** देवाला कापसाचे वस्त्र वहावे.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः यज्ञोपवीतं समर्पयामि ।।** देवाला यज्ञोपवीत/अक्षदा वहाव्या.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः विलेपनार्थे चंदनं समर्पयामि ।।** देवाला गंध लावावे.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः कुंकुमं अक्षतांश्च समर्पयामि ।।** देवाला हळद- कुंकू, अक्षदा घालाव्यात.

**श्रीअनघालक्ष्म्यै नमः । नानाविध मंगलद्रव्याणि समर्पयामि ।।** अनघादेवीला हळद-कुंकू, बांगड्या, मंगळसूत्र वाहावे.

७) मुख्यदेवाच्या पश्चिमभागी – **कामावसायितायै नमः । आवाहयामि । स्थापयामि । पूजयामि ।।** गंधाक्षतफूल घालावे.

८) मुख्यदेवाच्या प्रथमपादाजवळ – **महिमायै नमः । आवाहयामि । स्थापयामि । पूजयामि ।।** गंधाक्षतफूल घालावे.

*(मध्यभागी कलशावर) **श्रीअनघदत्त आवाहन ।।**

**समासीनः प्रशान्तात्मा कृपाब्धिरनघाह्वयः । दत्तात्रेयो गुरुर्विष्णु ब्रह्मेशात्मा स नोऽवतु ।।**

**मुख्यदेवता श्रीमदनघदत्ताय नमः ।** आवाहयामि । स्थापयामि ।।

*(कलशावर अनघदत्तांच्या डावीकडे) **श्रीअनघालक्ष्मी आवाहन ।।**

**पद्मासना पद्मकरा भक्ताधीना पतिव्रता । अनघाम्बा महालक्ष्मीर्महाभागा च नोऽवतु ।।**

**मुख्यदेवता श्रीअनघालक्ष्म्यै नमः ।** आवाहयामि । स्थापयामि ।।

(देवतापीठास स्पर्श करुन, **प्राणाः प्रतिष्ठिताः संतु ।।** असे म्हणुन अक्षदा घालाव्यात.)

***षोडशोपचारपूजारंभः ।***

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः ध्यायामि ।** असे म्हणून देवाला अक्षता वहाव्या.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः** आवाहयामि । असे म्हणून देवाला अक्षता वहाव्या.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः आसनार्थे तुलसीपत्रं समर्पयामि ।**

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः पाद्यं समर्पयामि ।** देवावर पळीभर पाणी घालावे.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः अर्घ्यं समर्पयामि ।।** देवाला गंधाक्षतफुलाचे पाणी घालावे.



**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः आचमनीयं समर्पयामि ।।** कापूरमिश्रित पाणी ताम्हनात सोडावे.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः स्नानं समर्पयामि ।।** देवावर पाणी घालावे.

***पंचामृतस्नान*** (दूध, दही, तूप, मध व साखर अशाक्रमाने देवास पंचामृतस्नान घालावे.)

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः पंचामृतस्नानं समर्पयामि ।।** यामंत्राने देवाला पंचामृतस्नान घालावे.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः शुद्धोदकस्नानं समर्पयामि ।** पंचामृतानंतर शुद्धपाण्याने स्नान घालावे.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः सकलोपचारार्थे गंधाक्षतपुष्पं समर्पयामि ।** यामंत्राने देवाला गंधाक्षतफूल घालावे. उदबत्ती, निरांजन ओवाळुन, पंचामृताचा नैवेद्य दाखवून प्रार्थना करावी.

**अनेन पंचामृतपूजनेन श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्तः प्रीयताम् ।** असे म्हणुन, पाणी सोडावे. यानंतर उत्तरेस देवनिर्माल्य विसर्जित करुन, देवांस अत्तर लावुन,गरमपाणी घालावे. व देव वस्त्राने स्वच्छ पुसून मूळजागी पुनः ठेवावा, यानंतर **सुप्रतिष्ठितमस्तु ।** असे म्हणुन देवास अक्षता घालाव्यात.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः कार्पासवस्त्रं समर्पयामि ।।** देवाला कापसाचे वस्त्र वहावे.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः यज्ञोपवीतं समर्पयामि ।।** देवाला यज्ञोपवीत/अक्षदा वहाव्या.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः विलेपनार्थे चंदनं समर्पयामि ।।** देवाला गंध लावावे.

**श्रीअनघालक्ष्मीसहित श्रीअनघदत्ताय नमः कुंकुमं अक्षतांश्च समर्पयामि ।।** देवाला हळद- कुंकू, अक्षदा घालाव्यात.

**श्रीअनघालक्ष्म्यै नमः । नानाविध मंगलद्रव्याणि समर्पयामि ।।** अनघादेवीला हळद-कुंकू, बांगड्या, मंगळसूत्र वाहावे.

**अथ श्रीअनघदत्तशतनामावलिः।। (या शतनामाने श्रीअनघदत्तांस तुलसी, पुष्प अथवा अक्षतार्चन करावे.)**

**मम अभिमतकार्य प्रतिबंधकपातकपरिहारपूर्वक अंतःकरणशुद्धिद्वारा श्रीअनघदत्तप्रीत्यर्थं श्रीअनघदत्तशतनामभिः तुलसीदलार्चनं/ पुष्पार्चनं/ अक्षतार्चन करिष्ये ।** पाणी सोडावे व देवाला मंत्राने पूजाद्रव्य अर्पण करावे.

| **।। अथ श्रीअनघदत्तस्वामी शतनामावलिः ।।** | | |
|---|---|---|
| १) ॐ श्रीदत्तात्रेयाय नमः ।। | ११) ॐ एकार्णमनुगामिने नमः ।। | २१) ॐ हरये नमः ।। |
| २) ॐ अनघाय नमः ।। | १२) ॐ योगसंपत्कराय नमः ।। | २२) ॐ सर्वोपकारिणे नमः ।। |
| ३) ॐ त्रिविधाघविदारिणे नमः ।। | १३) ॐ षडर्णमनुपालाय नमः ।। | २३) ॐ मोक्षदायिने नमः ।। |
| ४) ॐ लक्ष्मीरूपानघेशाय नमः ।। | १४) ॐ अष्टार्णमनुगम्याय नमः ।। | २४) ॐ ॐरूपिणे नमः ।। |
| ५) ॐ योगाधीशाय नमः ।। | १५) ॐ पूर्णानंदवपुष्मते नमः ।। | २५) ॐ भगवते नमः ।। |
| ६) ॐ दाँबीजध्यानगम्याय नमः ।। | १६) ॐ द्वादशाक्षरमंत्रस्थाय नमः ।। | २६)ॐ दत्तात्रेयाय नमः ।। |
| ७) ॐ विज्ञेयाय नमः ।। | १७) ॐ आत्मसायुज्यदायिने नमः ।। | २७) ॐ स्मृतिमात्रसुतुष्टाय नमः ।। |
| ८) ॐ गर्भादितारणाय नमः ।। | १८) ॐ षोडशार्णमनुस्थाय नमः ।। | २८) ॐ महाभयनिवारणाय नमः ।। |
| ९) ॐ दत्तात्रेयाय नमः ।। | १९) ॐ सच्चिदानंदशालिने नमः ।। | २९) ॐ चिदानंदात्मने नमः ।। |
| १०) ॐ बीजस्थवटतुल्याय नमः ।। | २०) ॐ दत्तात्रेयाय नमः ।। | ३०) ॐ बालोन्मत्तपिशाचादिवेषाय नमः |



| | | |
|---|---|---|
| ३१) ॐ महायोगिने नमः ।। | ४५) ॐ वाक्प्रदाय नमः ।। | ६०) ॐ सर्वव्याधिहराय नमः ।। |
| ३२) ॐ अवधूताय नमः ।। | ४६) ॐ क्लींबीजसमुपास्याय नमः ।। | ६१) ॐ पराभिचारशमनाय नमः ।। |
| ३३) ॐ अनसूयानंदनाय नमः ।। | ४७) ॐ त्रिजगद्वश्यकारिणे नमः ।। | ६२) ॐ आधिव्याधिनिवारिणे नमः ।। |
| ३४) ॐ अत्रिपुत्राय नमः ।। | ४८) ॐ श्रीमुपासनतुष्टाय नमः ।। | ६३) ॐ दुःखत्रयहराय नमः ।। |
| ३५) ॐ सर्वकामफलानीकप्रदात्रे नमः ।। | ४९) ॐ महासंपत्प्रदाय नमः ।। | ६४) ॐ दारिद्र्यद्राविणे नमः ।। |
| | ५०) ॐ ग्लौमक्षरसुवेद्याय नमः ।। | ६५) ॐ देहादार्ढ्यायापोषाय नमः ।। |
| ३६) ॐ प्रणवाक्षरवेद्याय नमः ।। | ५१) ॐ भूसाम्राज्यप्रदायिने नमः ।। | ६६) ॐ चित्तसंशोषकारिणे नमः ।। |
| ३७) ॐ भवबंधविमोचिने नमः ।। | ५२) ॐ द्राँबीजाक्षरवासाय नमः ।। | ६७) ॐ सर्वमंत्रस्वरूपाय नमः ।। |
| ३८) ॐ ऱ्हींबीजाक्षरपालाय नमः ।। | ५३) ॐ महते नमः ।। | ६८) ॐ सर्वयंत्रस्वरूपिणे नमः ।। |
| ३९) ॐ सर्वैश्वर्यप्रदायिने नमः ।। | ५४) ॐ चिरंजीविने नमः ।। | ६९) ॐ सर्वतंत्रात्मकाय नमः ।। |
| ४०) ॐ क्रोंबीजजपतुष्टाय नमः ।। | ५५) ॐ नानाबीजाक्षरोपास्याय नमः ।। | ७०) ॐ सर्वपल्लवरूपिणे नमः ।। |
| ४१) ॐ साध्याकर्षणदायिने नमः ।। | ५६) ॐ नानाशक्तियुजे नमः ।। | ७१) ॐ शिवाय नमः ।। |
| ४२) ॐ सौंबीजप्रीतमनसे नमः ।। | ५७) ॐ समस्तगुणसंपन्नाय नमः ।। | ७२) ॐ उपनिषद्वेद्याय नमः ।। |
| ४३) ॐ मनःसंक्षोभहारिणे नमः ।। | ५८) ॐ अंतःशत्रुविदाहिने नमः ।। | ७३) ॐ दत्ताय नमः ।। |
| ४४) ॐ ऐंबीजपरितुष्टाय नमः ।। | ५९) ॐ भूतग्रहोच्चाटनाय नमः ।। | ७४) ॐ भगवते नमः ।। |

| | | |
|---|---|---|
| ७५) ॐ दत्तात्रेयाय नमः ।। | ८४) ॐ चिद्रूपिणे नमः ।। | ९३) ॐ सकललोकौघसंचाराय नमः ।। |
| ७६) ॐ महागंभीररूपाय नमः ।। | ८५) ॐ प्रज्ञारूपाय नमः ।। | ९४)ॐसकलदेवौघवशीकृतिकराय नमः |
| ७७) ॐ वैकुंठवासिने नमः ।। | ८६) ॐ आनंदरूपिणे नमः ।। | ९५) ॐ कुटुंबवृद्धिदाय नमः ।। |
| ७८) ॐ शंखचक्रगदाशूलधारिणे नमः | ८७) ॐ ब्रह्मरूपिणे नमः ।। | ९६) ॐ गुडपानकतोषिणे नमः ।। |
| ७९) ॐ वेणुनादिने नमः ।। | ८८) ॐ महावाक्यप्रबोधाय नमः ।। | ९७) ॐ पंचकर्जाय सुप्रीताय नमः ।। |
| ८०) ॐ दुष्टसंहारकाय नमः ।। | ८९) ॐ अष्टपुत्रकुटुंबिने नमः ।। | ९८) ॐ कंदफलादिने नमः ।। |
| ८१) ॐ शिष्टसंपालकाय नमः ।। | ९०) ॐ तत्त्वाय नमः ।। | ९९) ॐ सद्गुरवे नमः ।। |
| ८२) ॐ नारायणाय नमः ।। | ९१) ॐ सकलकर्मौघनिर्मिताय नमः ।। | १००) ॐ श्रीमद्दत्तात्रेयाय नमः ।। |
| ८३) ॐ अस्रधराय नमः ।। | ९२) ॐ सच्चिदानंदरूपाय नमः ।। | |

**अथ श्रीअनघादेवीशतनामावलिः।। (कुंकुमार्चनम् ।)**

(स्त्रियांसाठी) **मम इहजन्मनि जन्मांतरे च अखंड सौभाग्य-पुत्रपौत्रादिवृद्धये सकलमनोरथसिद्ध्यर्थं** /(कुमारिकांचे विवाह ठरण्यासाठी) **मम विवाहप्रतिबन्धकजन्मांतरीय दुरितनिरसनपूर्वकं शीघ्रमनायासेन कुलशीलादिसंपत्तिमद्वरलाभार्थं** (संततीसाठी) **मम जन्मांतरीयसंततिप्रतिबन्धक- दुरितनिरसनपूर्वकं कुलाभिवृद्ध्यै श्रीअनघादेवीप्रीत्यर्थं श्रीअनघादेवीशतनामभिः कुंकुमार्चनं/ पुष्पार्चनं/ अक्षतार्चनं वा करिष्ये।।** पाणी सोडावे.



**देवित्वामनघे भद्रे सर्वमंगलमंगल। लसत्कुंकुमचूर्णेन पूजयामि प्रसीद मे ।। श्रीअनघादेव्यै नमः। कुंकुमपूजां समर्पयामि।।** अनघादेवीस कुंकुमार्चन करावे. (प्रथम चिमटभर हळद वाहून, पुढील प्रत्येक नामाने कुंकू वाहावे.)

**।। अथ श्रीअनघादेवीशतनामावलिः।।**

| | | |
|---|---|---|
| १) ॐ श्रीअनघायै नमः ।। | १२) ॐ मनोज्ञायै नमः ।। | २२) ॐ तापत्रयनुदे नमः ।। |
| २) ॐ महादेव्यै नमः ।। | १३) ॐ योगशक्तिस्वरूपिण्यै नमः ।। | २३) ॐ हरिद्रांचत्प्रपादायै नमः ।। |
| ३) ॐ महालक्ष्म्यै नमः ।। | १४) ॐ योगातीतहृदे नमः ।। | २४) ॐ मंजीरकलजत्रवे नमः ।। |
| ४) ॐ अनघास्वामिपत्न्यै नमः ।। | १५) ॐ चित्रासनोपविष्टायै नमः ।। | २५) ॐ शुचिवल्कलधारिण्यै नमः ।। |
| ५) ॐ योगेशायै नमः ।। | १६) ॐ पद्मासनयुजे नमः ।। | २६)ॐ कांचीदामयुजे नमः ।। |
| ६) ॐ त्रिविधाघविदारिण्यै नमः ।। | १७) ॐ रत्नांगुलीयक- लसत्पदांगुल्यै नमः ।। | २७) ॐ गले मंगल्यसूत्रायै नमः ।। |
| ७) ॐ त्रिगुणेशायै नमः ।। | | २८) ॐ ग्रैवेयालीधृते नमः ।। |
| ८) ॐ सिद्धसेव्यपदे नमः ।। | १८) ॐ पद्मगर्भोपमानांघ्रितलायै नमः ।। | २९) ॐ क्वणत्कंकणयुक्तायै नमः ।। |
| ९) ॐ आत्रेयगृहदीपायै नमः ।। | १९) ॐ भर्तृशुश्रूषणोत्कायै नमः ।। | ३०) ॐ पुष्पालंकृतायै नमः ।। |
| १०) ॐ विनीतायै नमः ।। | २०) ॐ मतिमत्यै नमः ।। | ३१) ॐ अभीतिमुद्राहस्तायै नमः ।। |
| ११) ॐ अनुसूयाप्रीतिदायै नमः ।। | २१) ॐ तापसीवेषधारिण्यै नमः ।। | ३२) ॐ लीलांभोजधृते नमः ।। |

३३) ॐ ताटंकयुगदीप्तायै नमः ।।
३४) ॐ नानारत्नदीप्तये नमः ।।
३५) ॐ ध्यानस्थिराक्ष्यै नमः ।।
३६) ॐ मूर्धाबद्धजटाराजत्–
सुमदामालायै नमः ।।
३७) ॐ भर्त्राज्ञापालनायै नमः ।।
३८) ॐ नानावेषधृते नमः ।।
३९) ॐ पंचपर्वान्वित–
विद्यारूपिकायै नमः ।।
४०) ॐ सर्वावरणशीलायै नमः ।।
४१) ॐ स्वबलावृतवेधसे नमः ।।
४२) ॐ विष्णुपत्न्यै नमः ।।
४३) ॐ स्वच्छशंखधृते नमः ।।
४४) ॐ मंदहासमनोज्ञायै नमः ।।
४५) ॐ मंत्रतत्त्वविदे नमः ।।
४६) ॐ दत्तपार्श्वनिवासायै नमः ।।
४७) ॐ रेणुकेष्टकृते नमः ।।
४८) ॐ मुखनिःसृतशंपाभ–
त्रयीदीप्त्यै नमः ।।
४९) ॐ विधातृवेदसंधात्र्यै नमः ।।
५०) ॐ सृष्टिशक्त्यै नमः ।।
५१) ॐ शांतिलक्ष्म्यै नमः ।।
५२) ॐ गायिकायै नमः ।।
५३) ॐ ब्राह्मण्यै नमः ।।
५४) ॐ योगचर्यारतायै नमः ।।
५५) ॐ नर्तिकायै नमः ।।
५६) ॐ दत्तवामांकसंस्थायै नमः ।।
५७) ॐ जगदिष्टकृते नमः ।।
५८) ॐ शुभायै नमः ।।
५९) ॐ चारुसर्वांग्यै नमः ।।
६०) ॐ चंद्रास्यायै नमः ।।
६१) ॐ दुर्मानसक्षोभकर्त्र्यै नमः ।।
६२) ॐ साधुहृच्छांतये नमः ।।
६३) ॐ सर्वांतःसंस्थितायै नमः ।।
६४) ॐ सर्वांतर्गण्यै नमः ।।
६५) ॐ पादस्थितायै नमः ।।
६६) ॐ पद्मायै नमः ।।
६७) ॐ गृहदायै नमः ।।
६८) ॐ सद्रत्नवस्त्रदायै नमः ।।
६९) ॐ गुह्यस्थानस्थितायै नमः ।।
७०) ॐ पत्नीदायै नमः ।।
७१) ॐ क्रोडस्थायै नमः ।।
७२) ॐ पुत्रदायै नमः ।।
७३) ॐ नहुषात्मजदात्र्यै नमः ।।
७४) ॐ वंशवृद्धिकृते नमः ।।



७५) ॐ हृद्गतायै नमः ।।
७६) ॐ सर्वकामपूरणायै नमः ।।
७७) ॐ प्रवासबंधुसंयोगदायिकायै नमः
७८) ॐ कंठस्थितायै नमः ।।
७९) ॐ हारादिभूषादात्र्यै नमः ।।
८०) ॐ मृष्टान्नदायै नमः ।।
८१) ॐ वाक्छक्तिदायै नमः ।।
८२) ॐ ब्राह्म्यै नमः ।।
८३) ॐ आज्ञाबलप्रदात्र्यै नमः ।।
८४) ॐ सर्वैश्वर्यकृते नमः ।।
८५) ॐ मुखस्थितायै नमः ।।
८६) ॐ कविताशक्तिदायै नमः ।।
८७) ॐ शिरोगतायै नमः ।।
८८) ॐ निर्दाहकर्त्र्यै नमः ।।
८९) ॐ जंभासुरविदाहिन्यै नमः ।।
९०) ॐ जंभवंशहृते नमः ।।
९१) ॐ दत्तांकसंस्थितायै नमः ।।
९२) ॐ वैष्णव्यैनमः ।।
९३) ॐ ऐंद्रराज्यप्रदायिन्यै नमः ।।
९४) ॐ लोकमात्रे नमः ।।
९५)ॐ धर्मकीर्तिसुबोधिन्यै नमः ।।
९६) ॐ शास्त्रमात्रे नमः ।।
९७) ॐ भार्गवक्षिप्रतुष्टायै नमः ।।
९८) ॐ कालत्रयविदे नमः ।।
९९) ॐ कार्तवीर्यव्रतप्रीतमतये नमः ।।
१००) ॐ शुचये नमः ।।
१०१) ॐ कार्तवीर्यप्रसन्नायै नमः ।।
१०२) ॐ सर्वसिद्धिकृतेनमः ।।

## (श्रीअनघादत्तव्रत विसर्जनाचा प्रयोग)

व्रताच्या दुसऱ्या दिवशी श्रीअनघादत्ताची पंचोपचार पूजा करुन, दूधसाखर अथवा दहीभाताचा नैवेद्य दाखवावा, यानंतर घरातील सर्वांनी देवदर्शन घ्यावे, यानंतर पूजेतील अनघादत्तमूर्ती बाहेर काढून, इतर देवांवर खालील मंत्राने अक्षता घाल्याव्या.

**ॐ यांतु देवगणाः सर्वे पूजामादाय पार्थिवीम् । इष्टकामप्रसिद्ध्यर्थं पुनरागमनाय च ।।** आवाहित देवताः विसर्जयामि ।।

।। श्रीदत्तअनघादेव्यै नमः ।।

# ।। श्रीदत्तअनघालक्ष्मीची कथा ।।

।। श्रीगणेशाय नमः ।। श्रीसरस्वत्यै नमः ।। श्रीगुरुभ्यो नमः ।। श्रीदत्त ।।

गुरुभक्त दीपकाने विचारले, '' श्रीगुरो ! पूर्वी एकदा जंभासुराच्या सैन्याने इंद्रासह सर्व देवांना पराजित केले, तेव्हा भगवंतांनी दैत्यांना जिंकून, देवांचे रक्षण केले, असे मी ऐकले होते, ते युद्धाने की योगसामर्थ्याने ? हे जाणण्याची मला उत्कंठा आहे, तरी कृपा करुन मला हे सविस्तर सांगा.'' यावर श्रीगुरु म्हणाले, '' वत्सा ! हेच पूर्वी धर्मराजांनी श्रीकृष्णांना विचारले होते, त्यांनी जे सांगितले होते, तेच मी तुला सांगतो, एकाग्रचित्ताने ऐक !''

श्रीकृष्ण म्हणाले, '' राजा युधिष्ठिरा ! महर्षी 'अत्री' हे ब्रह्मदेवाचे मानसपुत्र असून होते, त्यांची पत्नी पतिव्रता अनसूया त्रिभुवनात प्रसिद्ध होती, त्यांच्या अद्वितीय व महान् तपस्वी पुत्राचे नाव 'महायोगी दत्तात्रेय' असून तो साक्षात् श्रीविष्णूंचा अंश होता. त्याचे नाव 'अनघ' असेही होते, सर्व ब्रह्मगुणांनी युक्त व प्रेमळ अशी लक्ष्मीस्वरूप 'अनघा' नावाची त्यांची पत्नी, नेहमी त्यांच्याबरोबर असे.त्यांच्या पोटी अणिमा, लघिमा, प्राप्ती, प्राकाम्य, महिमा, ईशित्व, वशित्व आणि कामावसायिता या आठ योगसिद्धी पुत्ररूपाने उत्पन्न झाल्या.

ब्रह्मदेवाकडून वर मिळालेल्या जंभासुराने स्वर्गात जाऊन शंभरवर्षेपर्यंत देवांना वेढा घातला. नंतर देव- दानवांचे युद्ध झाले, त्याने चंद्र व मरुद्गणांसह इंद्राला स्वर्गातून हाकलून दिले, यामुळे देव आपापली स्थाने सोडून पळत असता, जंभादि दैत्य त्यांचा पाठलाग करीत, विविध वाहनांवर बसून, नाना शस्त्रांचा मारा करु लागले.



तेव्हा आत्मरक्षणासाठी देव, विंध्यपर्वतावर योगाभ्यास रत असणाऱ्या, श्रीअनघ व श्रीअनघा या दांपत्याच्या आश्रमात आले व म्हणाले, '' जगन्नाथा ! जंभदैत्याने आमचा पराभव केल्यामुळे, आम्ही आपल्याला शरण आलो आहोत. आपल्या चरणकमलांशिवाय आम्हाला दुसरा कोणताही आधार नाही, आमचे रक्षण करा.'' त्यांची करुणावाणी ऐकून, भगवान अनघदत्तांनी त्या अनघदेवीला लीलेसाठी तेथेच ठेवले आणि देवांना आश्रमात निर्भयपणे राहाण्यास सांगितले.

ते ऐकुन संतुष्ट मनाने देव आत गेले, तोवर दैत्य तेथे येऊन मोठ्याने ओरडू लागले, '' त्या मुनीपत्नीला पकडा, त्यांची झाडे व फुलेफळे उध्वस्त करा.'' यानंतर त्यांनी त्या अनघादेवीला मस्तकावर घेतले, ते पाहून श्रीदत्तांनी ध्यानाग्नीने क्षणात् त्यांचे सामर्थ्य नष्ट केले, यामुळे ते दैत्य निस्तेज व ऐश्वर्यहीन झाले. यानंतर देवांनी पाठलाग करुन, त्यांच्यावर प्रचंड शस्त्रास्त्रांचा मारा केला, त्यावेळी ते देवशत्रू रडत- ओरडत निश्चेष्ट होऊन पडले.

अशाप्रकारे अनघमुनींच्या प्रभावामुळे, जंभादि दैत्य नष्ट झाले आणि सर्व देवांना पूर्वीप्रमाणे आपले स्थान प्राप्त झाले. अशारीतीने देवांनी अनघदत्तांचा महिमा अनुभवला. ते सर्वलोकांच्या कल्याणासाठी सदैव तत्पर असतात, त्यांनी काया- वाचा - मनाने त्रैलोक्याचे कल्याणच केले.

भगवान् अनघांनी सर्व नियम पाळुन व वर हात करुन, भ्रूमध्यावर एकटक निश्चल दृष्टी करुन, लाकुड, पर्वत किंवा एखाद्या शिळेप्रमाणे हालचाल न करता, तीनहजार दिव्यवर्षे 'ब्रह्मोत्तर' नावाचे तप केले, यावेळी माहिष्मती नगरीच्या कार्तवीर्यार्जुन राजाने त्यांची रात्रंदिन निरलसपणे शारीरिक सेवा व निष्ठेने पूजाअर्चा केली. तेव्हा संतुष्ट होऊन श्रीअनघांनी त्या तेजस्वी राजाला चार वर मागण्यास सांगितले,(१)' आपल्याला एकहजार हात असावेत,(२) 'आपण (कार्तवीर्यार्जुन) अधर्माने वागू लागल्यास

आपणास सज्जनांनी रोखावे,(३) 'धर्मानि पृथ्वी जिंकून, धर्मानेच आपण तिचे पालन करावे,(४)'पुष्कळ युद्धे जिंकून हजारो वीरांना मारल्यावर, आपल्याहून बलवान् शत्रूकडून आपला वध व्हावा,' असे चार वर मागितले. तेव्हा संतुष्ट झालेल्या भगवंतांनी त्याला इहलोकीच्या निष्कंटक राज्यासह सविस्तर योगाभ्यासाचे ज्ञान व अष्टसिद्धींनीयुक्त चक्रवर्तीपदही दिले.

यानंतर त्याने सप्तद्वीप, सात पर्वत व सात समुद्रांनीयुक्त पृथ्वी धर्मयुद्धाने आत्मसात केली. त्या बुद्धिमान राजाचा प्रभाव असा होता की, त्याने इच्छा करताच, मायेने हजार हात, रथ, ध्वज इत्यादि प्रगट होत. त्याने सातद्विपामध्ये विपुल दक्षिणांनीयुक्त दहा हजार यज्ञ केले.त्या यज्ञांतील वेदी व यूप सोन्याचे होते. त्या यज्ञास सर्व देवादिक विमानात बसून येत व त्या राजाचा अलौकीक महिमा पाहून म्हणत की,'' यज्ञ, दान, तप, पराक्रम व विद्वत्ता याबाबतीत कोणताही राजा या जगात कार्तवीर्याची बरोबरी करू शकणार नाही.''

तो राजा योगसामर्थ्याने सशस्त्र होऊन, सातही द्वीपावर संचार करी, तेव्हा तो दूर असला तरी जवळ असल्यासारखा भासत असे. धर्मानुसार प्रजेचे रक्षण करणाऱ्या, त्याच्या राज्यात चोरी, दुःख किंवा कष्ट नव्हतेच. तोच पशूंचे व शेतांचे रक्षण करी, तोच पाऊस पाडी, यामुळे त्याला 'मेघ' म्हणत आणि योगी असल्यामुळे 'अर्जुन' म्हणत. असे त्याने पंचाऐशीहजारवर्षे समुद्रवलयांकित पृथ्वीवर एकछत्री राज्य केले.

तो जेव्हा सूर्यकिरणांसारख्या चमकणाऱ्या हजार हातांनी समुद्रात क्रीडा करी, तेव्हा समुद्र खळबळल्याने त्यातून उठलेल्या लाटांनी, प्रचंड मासेसुद्धा मरून जात. पाताळात राहाणारे मोठेमोठे दैत्यही दबून राहात. त्याने 'कर्कोटक नागास' बंदी केले होते. तसेच 'नर्मदानदीला' मदोन्मत्त होऊन, खेळत खेळत उलट दिशेने वाहावयाला लावले.



त्याने रावणालाही बंदिवान् करून माहिष्मतीत बांधून ठेवले, नंतर महर्षी पुलत्स्यांच्या विनंती वरुन, त्याने रावणाला सोडले. याशिवाय भुकेलेल्या अग्नीस सप्तद्वीपयुक्तपृथ्वी भिक्षेत दिली, असा सर्वगुणसंपन्न राजा, योगाचार्य भगवान् अनघांच्या वरामुळे, पृथ्वीवर प्रसिद्ध झाला. त्यामुळेच त्याला हे वैभव लाभले.

ही अष्टमी 'अघ म्हणजे पाप' नाहीसे करते, म्हणून तिला 'अनघाष्टमी' म्हणतात, भक्तीने ज्याला वश केले असता, सर्व पापे नष्ट होतात व ज्याच्यामुळे सर्व जग निष्पाप होते, त्याला 'अनघ' म्हणतात, 'निष्पापत्व' असे हे परब्रह्म 'श्रीदत्त' माझाच अंश मानले गेले आहेत. कार्तवीर्यानेच ही 'अनघाष्टमी' पृथ्वीवर प्रचारात आणली, हे व्रत करणाऱ्याला अष्टैश्वर्य प्राप्त होते.

युधिष्ठिराने विचारले,'' हे केशवा ! सहस्रार्जुनाने हे व्रत कसे केले, या व्रताचे मंत्र व नियम कोणते ? तसेच कोणत्या वेळी व कोणत्या तिथीला हे व्रत करावे, तसेच या लोकांत प्रसिद्ध कसे झाले ? ते मला सांगा.''

श्रीकृष्ण म्हणाले,'' हे युधिष्ठिरा ! मार्गशीर्ष कृष्णाष्टमीला हे व्रत करावे, अनेक पुत्रांनीयुक्त, अनघ व अनघा या दांपत्याच्या दर्भनिर्मित प्रतिमा, शांत व मंगलकारक मंडल तयार करुन, त्यावर स्थापन कराव्या, स्नान करुन श्रीविष्णुस्वरूप अनघ व श्रीलक्ष्मीरूपिणी अनघादेवी तसेच प्रद्युम्नादि पुत्रांची सुगंधी फुलांनी तसेच वेदमंत्रांनी किंवा नाममंत्रांनी पूजा करावी. नैवेद्यासाठी उत्तम फळे, बोरे घ्यावीत, तसेच सुगंधी द्रव्ये, धूप, दीप इत्यादि अर्पण करावे. यानंतर यथाशक्ती भोजन घालावे.

व्रताच्या शेवटी, दुसऱ्या व्रतेच्छूने ते व्रत घेऊन, निश्चयाने पुढे चालू ठेवावे, नंतर व्रतपारणे करावे, असे हे व्रत जीवनभर करावे, असे मी खरोखर सांगतो. कमीत कमी एक वर्षभर तरी हे व्रत करावे. रात्री नृत्य, गीतादींनी आनंदात जागरण करावे आणि नवमीला पहाटे पूजेचे पाण्यात विसर्जन करावे, अशारीतीने जो हे व्रत भक्तिश्रद्धेने करतो, तो पापमुक्त होऊन, त्यांचे कुटुंब वाढते,

त्याच्यावर श्रीविष्णुकृपा होते, सातजन्म आरोग्यलाभ होऊन, अंती मोक्ष मिळतो. हे कुंतीपुत्रा ! तुझ्या कल्याणासाठी अनंत पातके नष्ट करणारी हे व्रत मी तुला सांगितले, जे एकाग्रतेने हे व्रत करतात, त्यांची कीर्ति कार्तवीर्याप्रमाणे वाढते व ते मोक्षाला जातात.

श्रीगुरु म्हणाले,'' वत्सा ! तुला मी श्रीदत्तकथा सांगितली, त्यांना 'अनघ' हे नाव कसे पडले व त्यांचे योगाचरण कसे होते, त्यांनी भक्तांना कसे वर दिले, हे व्रत अनघदेवांना संतुष्ट करणारे कसे आहे, हे सारे मी तुला विस्ताराने सांगितले.

## सुशीलेची कथा

फार फार पूर्वी एका गावात एक ब्राह्मण राहात होता, त्याच्या मुलीचे नाव सुशीला, पूर्वसुकृताने लहानपणापासूनच ती गुरुमार्गी असुन, नित्य दत्तनाम घेत असे. लहान वयातच तिचा विवाह झाला, ती पतीची मनोभावे सेवा करीत होती, परंतु दुर्भाग्याने तिचा पती तिचा अतिशय छळ करीत असे, तिच्यावर नको नको ते दोषारोपण करीत असे, त्यामुळे तिला मानसीक सुख नव्हते. सुशीलेचे सासु- सासरे व मोठी माणसे तिच्या नवऱ्यास परोपरी समजावीत, परंतु तो कोणाचेच ऐकत नसे.

एकदा त्यांच्या गावात एक मांत्रिक आला होता, त्याला ज्योतिषशास्त्राचे चांगले ज्ञान होते, त्याने सुशीलेच्या सासु- सासऱ्यांना बोलावुन घेतले व सुशीलेची कुंडली मांडून, चित्रविचित्र पूजाअर्चा करुन म्हणाला,'' ही नीच स्त्री आहे, तिच्या हातून अनेक अमंगळकार्ये घडली आहेत, त्यामुळे तिच्या पतीस नपुंसकत्व प्राप्त झाले, तिला घरातुन बाहेर काढल्यावरच तुमचे सारे गृहदोष जातील व तिचा पती सशक्त होईल, यानंतर तुम्ही त्याचा दुसऱ्या मुलीबरोबर विवाह लावुन द्या. त्यांना यथाकाल संतती होईल.'' त्या मांत्रिकाच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन, सुशीलेच्या सासु- सासऱ्यांनी तिचा छळ आरंभला आणि एक दिवस तिला घराबाहेर हाकलुन दिले, तिच्यासमोर काहीच मार्ग नसल्याने ती आपल्या माहेरी चालली.



एवढ्यात त्या मांत्रिकाने वाईट नजरेने तिला अडवले, हे पाहुन सुशीलेला मांत्रिकाचा फार राग आला, तिने स्वसंरक्षणासाठी जवळचा दगड मांत्रिकास मारला, तो वर्मी लागल्याने जागेवरच तो मांत्रिक मरण पावला. दुर्दैवाने तिच्या हातुन ब्रह्महत्या घडली आणि गावातील लोकांनी हा प्रसंग पाहिला होता, वणव्यासारखी ही बातमी गावात पसरली.

यामुळे सुशीलाही खिन्न झाली, त्या आवारातच एक औदुंबराचे झाड होते, अशा ठिकाणी दत्ताचा वास असतो, हे जाणुन सुशीला औदुंबराखाली बसली, नकळत तिला गाढ झोप लागली, थोड्याच वेळात जागृती येऊन ती पाहाते तो, दोन सर्प तिचे रक्षण करीत असताना तिला दिसले. त्यांना नमस्कार करताच ते दुसरीकडे निघुन गेले, आपल्यावर श्रीदत्तप्रभूंचे कृपाछत्र असल्याचा तिला अनुभव आला

अशा विमनस्क अवस्थेत तिला 'रविदास' नावाचा श्रीपादभक्त भेटला, तो श्रीपादवल्लभ स्वामींच्या दर्शनासाठी कुरवपुरास चालला होता, परंतु ''आपण तुला, किंवा श्रीपादवल्लभस्वामींनाही जाणत नाही, तर केवळ दत्तनाम घेते, त्यामुळे मी तुझ्यासोबत कोठेही येऊ इच्छित नाही,'' असे म्हणुन ती एका पर्वतावर पद्मासन घालुन दत्तध्यानात मग्न झाली, इतक्यात दोन दुष्ट माणसे तिथे आली, सुशीलेला पाहुन दुष्टभावनेने ते तिच्यामागे लागले. ती धावत असता, तिला श्रीपादभक्त रविदासांची भेट झाली, त्यांनी श्रीपादांच्या भरोश्यावर सुशीलेचे रक्षण केले, 'परंतु अशा घोर अरण्यात दोन सशक्तांना आपण नमविले हे आपले कर्तृत्व नसुन श्रीपादस्वामींची कृपा आहे,' हे रविदास जाणत होते.

यानंतर सुशीला त्यांच्यासह कुरवपुरास श्रीपाददर्शनास निघाली, वाटेत त्यांना 'त्रिकालज्ञ दत्तभक्त श्रीनामानंदस्वामींचे' दर्शन घडले, यांच्यावर श्रीपादस्वामींची पूर्णकृपा होती, यांचे अद्भुत चरित्र होते, यांना विनयाने सुशीला म्हणाली, ''स्वामी ! संकटातुन कशी सुटका करुन घ्यावी ?'' त्यावर श्रीनामानंदस्वामी तिला म्हणाले,'' आत्मा हा निरंतर असतो, त्याला जन्म-मरण

नसते, त्याला कोणी कोणतीही इजा करु शकत नाही, मनुष्य मात्र कोट्यावधीवेळा मृत्यु पावुन, पुनः जन्म घेतो, तू अनघादेवीचे व्रत केल्यास संसारात सुखी होशील. तू अनघादेवीसमवेत श्रीदत्तात्रेयांची आराधना करुन त्यांना संतुष्ट करुन घे. असे केल्याने श्रीदत्तात्रेय नक्कीच तुझ्यावर अनुग्रह करतील.''

श्रीनामानंदस्वामींच्या उपदेशाने सुशीलेला धीर आला, दुसरे दिवशी सकाळी आश्रमात अन्नसामुग्रीने भरलेली गाडी आली, ती सामुग्री आश्रमात उतरवुन, तो गाडीवान सुशीलेस म्हणाला,'' थोड्याच वेळात तुझा पती, सासु- सासरे दुसऱ्या बैलगाडीतुन येतील,'' त्या गाडीवानाच्या बोलण्यात एक वेगळेच माधुर्य होते, तो इतरांसारखा नव्हता, निरोप सांगुन तो त्वरेने निघुन गेला, यावेळी श्रीनामानंदस्वामी ध्यानात होते, ते ध्यानातुन उठुन बाहेर येऊन विचारु लागले, ''तो गाडीवान कोठे आहे,'' तो सामान ठेऊन, निघुन गेल्याचे कळताच नामानंदस्वामी म्हणाले,'' तुम्ही कीती भाग्यवान् आहात, परमकारुण्यमूर्ती श्रीपादवल्लभ आपणासाठी गाडीवानाच्यारूपात अन्नसामुग्री घेऊन आले होते, त्यांनी तुम्हाला दर्शन दिले.'' नंतर ते सुशीलेला म्हणाले,'' हे सुशीले ! तुझे नशिब उदयास आले, तुझ्या पतीचे नपुंसकत्व गेले, तुझे सासु- सासरे आणि पती दुसऱ्या बैलगाडीने येत आहेत.'' श्रीपाददत्तप्रभूंच्या आशीर्वादाने, श्रीनामानंदस्वामींच्या सांगण्यानुसार सारे घडुन आले, सुशीला आपला पती व सासुसासऱ्याबरोबर आपल्या माहेरी गेली व नामानंदस्वामींच्या आज्ञेनुसार श्रीदत्तअनघालक्ष्मीची उपासना करुन दत्तकृपेने सुखाने संसार करू लागली, सुशीलेप्रमाणे ते श्रीदत्तअनघालक्ष्मी आपणांसही संतुष्ट व वरदायक होवोत.

अशाप्रकारे प्रत्येक महिन्याच्या कृष्णाष्टमीस जो श्रद्धेने श्रीदत्तअनघालक्ष्मीव्रत करतो, तो पापमुक्त होतो. त्याचे कुटुंब, वंश निरोगी वाढतो, त्याच्यावर विष्णूंचा प्रसाद होऊन, इहलोकी विमलकीर्ति व अंती विष्णुपदप्राप्ति होते.



## ।। श्रीअनघादत्त उपासना ।।

**श्रीअनघादत्त आरती ।।** पद्मासनी पद्मासन श्रीगुरुवर दत्ता । वामी विलसे सुंदर श्रीअनघामाता ।। भक्तोद्धारातत्पर, पालक, जगभर्ता । निवसो हृदयी निरंतर गुरु मायाकर्ता ।।१।। जयदेव जयदेव जय अनघदत्ता । अनघादेविसमेता पावे मज भक्ता ।।धृ।। उग्रतपे बहु तपला जंभ अनाचारी । नाडली देवस्थाने, देव निराधारी ।। आले धावत सदनी, जेथे कैवारी । निवसे अनघस्वामी, अनघेचे द्वारी ।।२।। जय० ।। तै तेथे आलीसे असुरांची सेना । शस्त्राघाते ताडिति, मारती, देवांना ।। माया रचुनी भ्रमवी, दैत्या, गुरुराणा । तेणे मोहुनी जाती, न कळे हे कोणा ।।३।।जय०।। वाहती शिरी मातेसी, विसरती ते नीति। तेणे पावती नरका, सद्यः कर्मगती ।। सुगती पावती सुरपती, हविभागप्राप्ति । नासति दैत्यकुळे, बहुमोदे सुरपंक्ती ।।४।। जय०।।

**अथ श्रीअनघाकवचाष्टकम् ।।** शिरो मे अनघा पातु भालं मे दत्तभामिनी । भ्रूमध्यं योगिनी पातु नेत्रे पातु सुदर्शिनी ।।१ ।। नासारंध्रद्वये पातु योगीशा भक्तवत्सला । मुखं मे मधुवाक्पातु दत्तचित्तविहारिणी ।।२ ।। त्रिकंठी पातु मे कंठं वाचं वाचस्पतिप्रिया । स्कंधौ मे त्रिगुणा पातु भुजौ कमलधारिणी ।।३ ।। करौ सेवारता पातु हृदयं मंदहासिनी । उदरं अन्नदा पातु स्वयंजा नाभिमंडलम् ।।४।। कमनीया कटिं पातु गुह्यं गुह्येश्वरी सदा । ऊरु मे पातु जंभघ्नी जानुनी रेणुकेष्टदा ।।५।। पादौ पादस्थिता पातु पुत्रदा वै खिलं वपुः । वामगा पातु वामांगं दक्षांगं गुरुगामिनी ।।६ ।। गृहं मे दत्तगृहिणी बाह्ये सर्वात्मिकाऽवतु। त्रिकाले सर्वदा रक्षेत् पतिशुश्रूषणोत्सुका ।।७।। जायां मे दत्तवामांगी अष्टपुत्रा सुतोऽवतु । गोत्रमत्रिस्नुषा रक्षेदनघा भक्तरक्षिणी ।।८ ।। यः पठेदनघाकवचं नित्यं भक्तियुतो नरः । तस्मै भवति अनघांबा वरदा सर्वभाग्यदा ।।९ ।। इति श्रीअनघाकवचाष्टकम् ।।

**अथ श्रीअनघादशमहाविद्या स्तोत्रम् ।।** सर्वविद्यादिभूता च महाकाली तमोगुणा । दशविद्यात्मिका देवी अनघायै नमोऽस्तु ते

।।१ ।। मोक्षदे दुःखहननी वसिष्ठाराधिता पुरा । उग्रतारा भगवती अनघायै नमोऽस्तु ते ।।२।। छित्त्वा स्वमुंडं रुधिरं दत्तं भाववशाद्यया । छिन्नमस्ता महाविद्या अनघायै नमोऽस्तु ते ।।३।। भोगमोक्षप्रदे देवि ज्ञानविज्ञानदायिनी । ईश्वरी षोडशीदेवी अनघायै नमोऽस्तु ते ।।४।। दशविद्यात्मिका देवी मंत्रेशी भुवनेश्वरी। व्यक्ताव्यक्तस्वरूपा सा अनघायै नमोऽस्तु ते ।।५।। आकर्षणविकर्षादिकारिणी सिंहरूपिणी । त्रिपुराभैरवीदेवी अनघायै नमोऽस्तु ते ।।६।। धूम्रावती महाविद्या शरणागततारिणी । उग्रतारास्वरूपिण्यै अनघायै नमोऽस्तु ते ।।७।। सकलारिष्टशमनी श्रीनिवाससमर्चिता । बगला शत्रुदमनी अनघायै नमोऽस्तु ते ।।८।। मुनिमातंगतनया मातंगी गृहकारिणी । चतुर्वर्गप्रदात्री च अनघायै नमोऽस्तु ते ।।९।। सर्वसौख्यप्रदात्री च वेंकटाचलवासिनी । भार्गवी कमलादेवी अनघायै नमोऽस्तु ते ।।१०।। यः पठेदनघास्तोत्रं दशविद्यास्वरूपकं । सो भुंक्ते दशविद्यानां वरदानाच्चिरं फलम्।।११।। देहि दत्तांगने मह्यं धनं सौख्यं चिरायुषम् । सुजायां पुत्रपौत्रं च धर्मबुद्धिं च देहि मे ।।१२।। जहि पूर्वार्जितं सर्वं पापभोगादि दुष्फलं । सुफलं सकलं कर्म तव चरणांबुजे रतिः ।।१३ ।। मतिर्भवतु मे नित्यं गुरुपादारविंदयोः। तदन्या सकला माया या मा वसतु मानसि।।१४।। इति श्रीअनघादशमहाविद्यास्तोत्रं संपूर्णम् ।।

**श्रीअनघाकरुणाप्रार्थना ।।** अष्टपुत्रा सौभाग्यवती । अनघस्वामी जिचा पती । ऐसी अनघा भगवती । तिसी नति पुनः पुनः ।।१।। जय जयहो अष्टसुते। अघनाशिनी दत्तकांते । त्वरे धावोन आम्हाते । संकटातून सोडवी ।।१ ।। नित्य दे धनसंपदा । वारी दुःख आपदा । पुत्रपौत्रादि संपदा । कुलशीला वाढवी ।।२ ।। वाढो मानमर्यादा । दिगंत यशोगाथा । नामशेष मनोव्यथा । सत्कथारुची वाढो ।।३ ।। लाभावे संसारसुख । अक्षय्यवंश पुत्रमुख । कुळाचार, जप-मख । वंशोवंशी आकल्प ।।४ ।। मनोवांछित संतती । भार्या-स्नुषा- जामाती। घडो सुयोग्य संगती । अंती होय श्रेयस्कर ।।५ ।। लक्ष्मी असावी स्थिर । कदा न त्यागो माझे घर। अलक्ष्मीते दार



। नसो माझे ।।८।। भूतबाधा निरसन । अपमृत्यु निवारण । क्लेश कलह निरसोन। सुखरूप ठेवावे ।।६ ।। निरोगी असावे शरीर। जीवन असेल तोवर। सुखे सुटावे शरीर । नामानंदी तुझीया।।६।। आम्ही तुझी संतती । कैशा पापभोगपंक्ती । नागविती दिवाराती। कष्ट होती असह्य ।।९ ।। तू असता निधान । आम्ही कैचे हीनदीन । कैसी होसील महान् । पुत्र दुःखे गांजता ।।१० ।। दुरित अवघे नासावे । कल्याणरूप असावे । इच्छिले ते लाभावे । ऐसे द्यावे वरदान ।।११ ।। पुण्यरूप अखिलधरा । सुख लाभो चराचरा । अविरोधे नारी-नरा। सुख लाभो अपार।।१२ ।। दत्त म्हणिजे देणे । ते तुझे सौभाग्यलेणे । मग भक्ता कैचे भीणे । उणे नेणे कदापिही।।१३ ।।

**।। श्रीअनघामाता की जय ।।**

(विवाह ठरण्यासाठी श्रीअनघामातेचा प्रार्थनामंत्र)

**सर्वसद्गुणसंपन्नो निर्व्यसनी सात्विको वरः। अनघे देहि कृपया गृहसौख्यादिभिःसह ।।**

(विवाह व सुखीसंसार होण्यासाठी मुलांनी म्हणावयाचा प्रार्थनामंत्र)

**देहि दत्तांगने मह्यं धनं सौख्यं चिरायुषम् । सुजायां पुत्रपौत्रं च धर्मबुद्धिं च देहि मे ।।**

**० गुरुतत्त्व प्रकाशनचे अधिकृत वितरक ०**

मे. आयडीयल बुक कंपनी, नारायण स्मृती, छबिलदास रोड, दादर, **मुंबई** २८, फो- ०२२- २४३०२१२६

मे. तुकाराम बुक डेपो ९७ सी. पी. टँक रोड, माधवबाग, मुंबई ४ मो.९८६९०३९३९४

मे. मॅजेस्टिक बुक डेपो, राममारुती रोड, न्यू गर्ल्स हायस्कूलसमोर, ठाणे ३ (प)

मे. मॅजेस्टिक बुक हाऊस, (मोरजकर) डोंबिवली. (मो.९००४८१२८७५)
श्री. महेश न. कुलकर्णी, **कोंढवा** रोड, कात्रज, **पुणे** ४६ (मो ९८९०९०६०३४)
मे. नेर्लेकर बुक डेपो, (सारंग) बुधवार पेठ, पुणे २ मोबा- ९७६६५४१०९९
मे. उज्वल ग्रंथ भांडार ६८३, बुधवार पेठ, आप्पा बळवंत चौक, पुणे २
मे. महाराष्ट्र ग्रंथ भांडार, महाद्वार रोड, **कोल्हापूर** (फो. ०२३१-२५२१०४५)
मे. रामचंद्र स्वीट मार्ट, प्रो. बड्डु, पुजारी, नृसिंहवाडी, ता. शिरोळ. मो.९८२२७६७१२९)
मे. न्यू नासिक बुक डेपो, महात्मा गांधी रस्ता, **नासिक** १ (फो- ०२५३- २५०९२७५)
मे. ज्योती बुक सेलर्स अँड स्टेशनर्स, गंगापूर रोड, नासिक २ (मो- ९३७३९०७७५१).
श्री दत्तात्रेय. र. धर्माधिकारी, चिंतामणी अपार्ट. विद्यानगरी, नासिकरोड, नासिक (मो-९४२२७६१०८२)
श्री. व्ही. बी. कवीश्वर, १५३२, मारुती गल्ली, **बेलगांव** २, फोन- ०८३१- २४२७९४३
श्रीदत्त मंदिर, माणगांव, ता. कुडाळ, जि. **सिंधुदुर्ग** (फो. ०२३६२- २३६२४५)
श्रीदत्तसंस्थान, (श्री. गवारीकर) मु. पो. गरुडेश्वर ता. राजपिपला, जि. नर्मदा **(गुजरात)**
श्रीनानामहाराज संस्थान, ८१/ १ गुरुकुल निवास, वरचा मजला, स्नेहलता गंज, **इंदौर** पि.४५२००३

सर्व स्त्री- पुरुषांसाठी अद्भुत, प्राचीन व शास्त्रशुद्ध श्रीअनघादत्तउपासनेसाठी
**श्रीअनघादत्तव्रत, श्रीअनघादत्तयाग, श्रीअनघादत्त उपासनाकल्प, अनघादत्त नामसाधना** (भजन)
**श्रीअनघादत्तप्रतिमा, श्रीअनघादत्तयंत्र, श्रीअनघादत्तमूर्ती, महासिद्ध दत्तयंत्र,**

श्रीदेवीभागवतादिग्रंथानुसार तयार केलेले शास्त्रशुद्ध व आयुर्वेदिक कुंकू **।। श्रीकुंकुम ।।**

प. टेंब्येस्वामींच्या परंपरेची व्याप्ती व पर्याप्त माहिती देणारा कृपांकित ग्रंथ
**प. प. श्रीटेंब्येस्वामी आणि परंपरा**
( मूल्य रु. १००/- पाने २४४)
प. टेंब्येस्वामींची चरित्रात्मक एकमेव बखर
**नारोपंतांची बखर** ( मूल्य रु. ५०/- पाने १५०)

श्रीक्षेत्रकरवीरातील नवदुर्गांचा संशोधित व अभ्यासपूर्ण एकमेव ग्रंथ
**नवदुर्गायात्रामार्गदर्शन**
पाने ५० / मूल्य रु. २५/-
**नवदुर्गामाहात्म्य**
पाने २५ / मूल्य रु. १०/-

दारिद्र्यनाश करुन, श्रीलक्ष्मीकृपा व धनधान्यादिऐश्वर्य देणारा ग्रंथ
**श्रीलक्ष्मीनारायणहृदयस्तोत्र**
(ओविबद्ध) मूल्य रु. ५/-

श्रीदेवीभागवतातील नर, नारायण व नारद संवादात्मक ग्रंथ
**दुर्गासप्तशतीसार** (लघुसप्तशती)
पाने ४८ मूल्य रु. २०/-

श्रीवासुदेवानंदसरस्वती (टेंब्ये) स्वामींच्या हस्ताक्षरातील
**घोरकष्टोद्धरणस्तोत्रम् ।**
साईज- १/८-रु.५/-
ए ४- रु. १०/- ए/३- रु. १५)
**दिगंबरानामजप**
(मूल्य रु. ५/-)

श्रीदक्षिणकाशी कोल्हापुरविषयीच्या दुर्मिळ माहितीने नटलेला, ओविबद्ध ग्रंथ.
**श्रीकरवीरनिवासिनीमाहात्म्य** (ओविबद्ध मूळग्रंथ) मूल्य रु. ६०/-
**गोष्टिरूप श्रीकरवीरनिवासिनीमाहात्म्य** (मराठी अनुवाद) रु.३५/
**श्रीकरवीरनिवासिनीमाहात्म्यसार**(ओविबद्ध मूळग्रंथाचे सार)रु.१०/
**श्रीकरवीरनिवासिनीमाहात्म्य अवतरणिका** - (पॉकिटसाईज ) रु. ५/

सर्व स्त्री- पुरुषांसाठी दत्तसंप्रदायातील अद्भुत व प्रासादिक व्रत
**श्रीअनघादत्तव्रत**
**श्रीदत्तअनघालक्ष्मीव्रत**
**शास्त्रशुद्ध श्रीअनघादत्तप्रतिमा**

**श्रीअनघादत्तांची रंगीतचित्रे, प्रतिमा, मूर्ती व यंत्रे उपलब्ध**

हजारो वर्षाचे आयुष्य असलेले
**महावतार बाबाजी (रु. ५०/-)**

**श्रीगंगापूजाकथा रु. ३०/-**
**श्रीशिवार्चना रु. ३०/-**

श्रीदत्तसंप्रदायातील गुप्तधन
(प. श्रीनारायणस्वामी श्रीनृसिंहवाडी विरचित)
**आनंदसागर** मूल्य रु. २०/-

श्रीअक्कलकोटस्वामींचे परमशिष्य
श्रीस्वामीसुत विरचित
**श्रीस्वामीसमर्थगाथा**

संपर्क - गुरुतत्त्व प्रकाशन २९१४ ए वांगीबोळ, कोल्हापूर १२, फो. (०२३१) २६२४७९२ मो. ९८५० ९६६२९७/ ९७६३२४४४९७

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni Galleria CHS., Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai - 400043.

YouTube: hariom astrologers
Facebook: hariom astrologers
Instagram: hariom_astrologers
hariomastrologers@gmail.com
www.hariomastrologers.com